# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### अर्जुनी-मोरगांव ते कोहमारा (जि.गोंदिया) या राज्य महामार्गाच्या विकासकामामध्ये कंत्राटदाराने मुरुम ऐवजी मातीचा भरणा केल्याबाबत

**(१) ९३३३ (२८-०५-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर या तिन्ही जिल्हयांना जोडणारा राज्य महामार्ग क्रमांक २७५ चे विकासकाम कंत्राटदार करत असल्याने त्या कंत्राटदाराने मुरुम ऐवजी मातीचा भरणा केल्याची बाब माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर दिड ते दोन फुट खोल खड्डे पडले असल्याने अनेकदा मोठ्या प्रमाणात अपघात झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांचे सदर रस्त्याच्या विकासकामाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्याच्या विकासकामामध्ये होत असलेल्या गैरकारभारामुळे स्थानिक नागरीकांनी आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार शासनाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-०६-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही, सदर रस्त्यावर वेळोवेळी खड्डे भरण्यात आलेले आहेत व खड्यांमुळे अपघात झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) हे खरे नाही. संबंधित कार्यकारी अभियंता यांनी सदर कामाची वेळोवेळी पाहणी केलेली आहे व सदर रस्त्याचे विकासकामाकडे कोणतेही दुर्लक्ष केलेले नाही.

(४) हे खरे नाही. सदर रस्त्याच्या विकासकामा संदर्भात स्थानिक नागरिकांनी आंदोलने केल्याची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२) ९३४९ (०३-०६-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) जिल्हा नियोजन वार्षिक योजनेत सन २०१८-१९ व सन २०१९-२० मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नगरविकास शाखेस लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत ९ कोटी ३५ लाख रुपये नगरपालिकेला देण्यासाठी दिले असता त्यांनी परस्पर गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी अप्पर विभागीय आयुक्त-१ औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र चौकशी समिती गठित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशी दरम्यान दोषी आढळून आले त्यांच्यावर समितीमार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०८-२०२०) :** (१) उस्मानाबाद जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१८-१९ व सन २०१९-२० या वर्षातील जिल्हा नियोजन समितीमार्फत नगर विकास शाखेस प्राप्त निधीच्या विनियोगात गैरव्यवहार झाल्याचे जानेवारी, २०२० च्या सुमारास निदर्शनास आलेले आहे.
(२) होय.
(३) अपर विभागीय आयुक्त-१, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना प्राप्त झालेला आहे.
• सदर समितीच्या अहवालानुसार चौकशीतील मुद्यांच्या अनुषंगाने संबंधितांना नोटीसा दिलेल्या असून खुलाश्याअंती दोषी असणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ऑनलाईन नोंदणी न झालेले केशरी कार्ड धारक तसेच इतर कार्ड धारकांना धान्य पुरवठा करण्याबाबत**

**(३) ९३८३ (२९-०५-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोव्हीड १९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे सर्वत्र संचारबंदी लावण्यात आल्याने सर्व उद्योगधंदे व व्यवहार बंद असल्याने नागरिकांच्या उपजीविकेचे साधन बंद झाल्यामुळे त्यांची उपासमार होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांची उपासमार टाळण्यासाठी सामान्य नागरिक, लोकप्रतिनिधी, सेवाभावी संस्था यांच्यामार्फत तसेच शासनातर्फे रेशनदुकानांवर अन्नधान्य वाटप करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेशन कार्ड धारकांना वेळेत आणि योग्य प्रमाणात धान्य वाटप होत नसून ऑनलाईन नोंदणी न केलेल्या केशरी कार्डधारकांनाही धान्य वाटप होत नसल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार ऑनलाईन नोंदणी न झालेले केशरी कार्ड धारक तसेच इतर कार्ड धारकांना वेळेत आणि योग्य प्रमाणात धान्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१५-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांसाठी नियमित अन्नधान्याव्यतिरिक्त प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेंतर्गत माहे एप्रिल, २०२० ते जून, २०२० या कालावधीकरिता प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो तांदुळ व प्रतिमाह प्रति कुटुंब १ किलो डाळ मोफत वितरणासाठी उपलब्ध करुन दिली असून सदर अन्नधान्याचे वितरण होत आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या तसेच शेतकरी योजनेत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना माहे मे व जून, २०२० या कालावधीकरिता सवलतीतील अन्नधान्याचा लाभ देण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत राज्यातील विनाशिधापत्रिकाधारक, स्थलांतरित मजूर इ. ना माहे मे व जून, २०२० या कालावधीकरिता प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो तांदुळ व प्रतिकुटुंब १ किलो अख्खा चणा मोफत वितरीत करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली नगरपालिकेमार्फत नगरोत्थान योजनेतून शहरात सुरु असलेल्या भूमिगत गटार योजनेची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत**

**(४) ९४१६ (२८-०५-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली नगरपालिकेमार्फत नगरोत्थान योजनेतून शहरात सुरु असलेली ७८ कोटी रुपयांची भूमिगत गटार योजनेची कामे निकृष्ट दर्जाची झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषद प्रशासनाने शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर, २०१६ च्या ई निविदा प्रक्रियेचे उल्लंघन करीत आर्थिक संगनमत करुन प्रथम दोन निविदा वैध असतांनाही १०१ कोटी रुपयांच्या निधीतून ९० कोटी २१ लाख रुपयांचे काम एकाच ठेकेदारास दिले असून कोट्यवधी रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार झाला असून रस्त्याची कामेही कोणत्याही मार्गदर्शक तत्वानुसार होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कामात गैरव्यवहार करणाऱ्या ठेकेदारावर व सहकार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०७-२०२०) :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत हिंगोली शहराच्या भुयारी गटार प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

• सदर योजनेतील कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या तांत्रिक मार्गदर्शन व देखरेखीखाली करण्यात येत असून, याची त्रयस्थ लेखापरिक्षक म्हणून शासकीय महाविद्यालय, औरंगाबाद या संस्थेव्दारे वेळोवेळी लेखापरिक्षण करण्यात आलेले आहे.

(२) सदर कामाची निविदा ही शासनाच्या https://mahatenders.gov.in या महाऑनलाईन ई-पोर्टलव्दारे ऑनलाईन बी-२ पध्दतीने प्रसिध्द केली आहे.

• तसेच, या निविदेची प्रसिध्दी विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील प्रसिध्द वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली आहे.

• उपरोक्त निविदा प्रक्रियेव्दारे अंदाज पत्रकापेक्षा कमी दराच्या प्राप्त निविदा धारकास निविदा देण्यात आलेली आहे व अंदाज पत्रकानुसार संपूर्ण कामे करुन घेण्यात येत आहेत.

(३) व (४) सदर प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे व संपूर्ण प्रकल्प कार्यान्वित करण्याचे हिंगोली नगरपरिषदेचे नियोजन आहे.

---

**कोल्हार-बाभळेश्वर (जि.अहमदनगर) रस्त्याच्या कामाबाबत**

**(५) ९६४९ (२८-०५-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर-मनमाड राज्यमार्गावरील कोल्हार-बाभळेश्वर (जि.अहमदनगर) या मार्गाची दुरुस्ती, बाह्यवळण रस्ता तसेच नदीवरील पुलासाठी तेथील मा.लोकप्रतीनिधीच्या पाठपुराव्यामुळे २३४

कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असूनही रस्त्याच्या कामास अद्यापही सुरवात झाली नसल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्याच्या कामास विलंब होत असल्याने रस्त्याची दुरवस्था होऊन राज्यमार्गावर अपघात होवून त्यात निष्पाप लोकांचे बळी जात असून अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे हे लक्षात घेता सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार सदर रस्त्याच्या दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-०६-२०२०) :** (१) कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्याबाबत शासनाने शा.नि. दिनांक ४ मे, २०२० नुसार बांधकामांवर बंधने घातलेली असल्याने प्रश्नाधीन कामांस सुरुवात होऊ शकलेली नाही.
(२) पोलीस स्थानकाचे अहवालानुसार वाहनचालकाचे निष्काळजीपणामुळे अपघात झाल्याचे आढळून आले आहे.

प्रश्नाधीन रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांनी केली आहे.
(३) प्रश्नाधीन रस्त्याचे काम शासनाचे मार्गदर्शक सूचनांचे अधिन राहून निधीच्या उपलब्धततेनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आश्वी बुद्रुक (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करण्याबाबत**

**(६) ९६८२ (३०-०५-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आश्वी बुद्रुक (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील पाणी पुरवठा योजनेसाठी स्थानिक लोकप्रतीनीधींच्या प्रयत्नाने राष्ट्रीय पेयजल योजनेतून १ कोटी, ३२ लाख, ५४ हजार ६० रुपये किंमतीची योजना सन २०१४ मध्ये मंजूर करण्यात येऊन दिनांक २४ जून, २०१४ रोजी या योजनेच्या कामाचे उद्घाटन होऊन एका वर्षाच्या मुदतीत कामपूर्ण करण्याचा ठेका संगमनेर येथील ज्योती कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठेकेदाराने या परिसरातील विस्तारित पाईप लाईन, वॉल, पंप हाऊस, विहीर दुरुस्ती, नवीन वीज पंप, बोर्ड हाऊस, रस्त्याची कामे व प्रवरा उजव्या कालव्यातून जाणाऱ्या पाईप लाईन तसेच चेंबरच्या कामांपैकी मागील सात वर्षात केवळ ७० टक्के काम

केले असून उर्वरीत ३० टक्के कामे शिल्लक असताना सदर कामाची १ कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम ठेकेदाराला अदा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनांच्या पाण्याच्या टाकीसाठी एका शेतकऱ्याने १ गुंठा जागा ग्रामपंचायतीला दिली असुन या जागेच्या परिसरातील २० गुंठे जमिनीवर पाणी पुरवठा योजनेचे साहित्य अस्ताव्यस्त पडल्यामुळे सदर जमीन पडीक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण होण्याच्यादृष्टीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठपूरावा करुनही त्याची दखल घेण्यात न आल्याने येथील आदिवासी व मागासवर्गीय नागरीकांना पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१५-०६-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे,

प्रश्नाधिन योजना आश्वी खु. ता.संगमनेर जि.अहमदनगर येथील आहे.

(२) अंशत: खरे आहे.

आश्वी खु.योजनेची ९० टक्के कामे पुर्ण झाली असून केलेल्या कामाच्या मुल्यांकनानुसार रु.१,२०,७९,५९८/- एवढी रक्कम ठेकेदारास अदा केली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील नाफेडमार्फत खरेदी केलेल्या तूर व हरभऱ्याचे चुकारे अदा करण्याबाबत**

**(७) ९७७६ (०२-०६-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात तूर आणि हरभऱ्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन झाले असून विपणन अधिकारी (डिएमओ) यांच्यामार्फत तूर व हरभरा खरेदीत अक्षम्य दिरंगाई झाल्याने शेतकऱ्यांचे चुकारे दोन ते तीन महिन्यापासून प्रलंबीत असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्हयातील शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या तूर व हरभराबाबत जिल्हा विपणन अधिकारी यांच्यामार्फत वेळीच कार्यवाही न झाल्याने हजारो क्विंटल माल खरेदी विक्री संघाकडे पडला असल्याने दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० नंतर शेतकऱ्यांचे चुकारे प्रलंबीत राहून शेतीची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शेतकऱ्यांची चुकारे अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२२-०७-२०२०) :** (१), (२) व (३) अमरावती जिल्हयात तूर व हरभरा (चना) खरेदीसाठी प्रत्येक २४ खरेदी केंद्र सुरु करण्यात आली असून तर खरेदीसाठी दिनांक ०३/०१/२०२० पासून व हरभरा खरेदीसाठी दिनांक २९/०२/२०२० पासून नोंदणी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. आतापर्यंत तूरीसाठी ४३१७३ व हरभरा ३२०९४ शेतकऱ्यांची नोंदणी झालेली आहे.

जिल्हयात तूर खरेदी दिनांक ७/२/२०२० पासून व हरभरा खरेदी दिनांक १९/३/२०२० पासून सुरु करण्यात आली असून दिनांक ३०.६.२०२० अखेरपर्यंत २७६०० शेतकऱ्यांकडून ३५१५५०.५३ क्विंटल तूर व १४८५२ शेतकऱ्यांकडून ३२५१५०.८४ क्विंटल हरभरा खरेदी करण्यात आला आहे.

कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे देशात २४ मार्च २०२० पासून लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे खरेदी प्रक्रियेत अडचणी निर्माण झाल्या होत्या. तथापि, केंद्र शासनाने व राज्य शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार खरेदी प्रक्रिया पुन्हा सुरळीत करण्यात आली. हरभरा नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची तूर व हरभरा खरेदी करता यावा, याकरिता खरेदी कालावधीही दोन वेळा वाढविण्यात आली आहे.

नाफेडकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निधीचे वितरण शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यासाठी केले जात असून शेतकऱ्यांनी नोंद केलेल्या बँक खात्यात चुकाऱ्यांची रक्कम जमा होत आहे. आतापर्यंत २१९५८ तूर शेतकऱ्यांना १५६.७५ कोटी व ८२४६ हरभरा शेतकऱ्यांना ७०.१४ कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांचे चुकारे नाफेडकडून निधी प्राप्त झाल्यानंतर करण्याचे नियोजित आहे.

शेतकऱ्यांकडून खरेदी केलेली तूर व हरभरा केंद्रीय वखार महामंडळ , राज्य वखार महामंडळ व भाडेतत्वावर घेतलेल्या गोदामामध्ये साठविण्यात येतो. वखार महामंडळाने केलेल्या नियोजनानुसार गोदामामध्ये मालाची साठवणूक केली जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दर्यापूर आणि अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) तालुक्यात कृत्रीम पाणीटंचाई निर्माण झाल्याबाबत

**(८) ९७७८ (२९-०५-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर आणि अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) तालुक्यातील गावांचा पाणीपुरवठा हा १५६ गावे व २ शहरे या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अंतर्गत येत असून शहाणूर धरणावरून सद्यस्थितीत पाणीपुरवठा सुरू असून अनेक गावात पाणीपुरवठ्याच्या

नियोजनशून्य कारभारामुळे कृत्रीम पाणीटंचाई निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर्यापूर आणि अंजनगाव विभागात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अंतर्गत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची बहुतांश पदे रिक्त असल्याने या विभागात पाणी पुरवठ्याचे काम कंत्राटदारा मार्फत करण्यात येत असल्याने कंत्राटदारांच्या मनमानी काराभारांमुळे कृत्रीम पाणीटंचाई निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणात पाणी उपलब्ध असताना उपरोक्त दोन्ही तालुक्यात तसेच पिंपळखुटा, बेंबळा बू. सासण बु, भाबळी, सुर्जी शहरातील काही भागात उन्हाळाच्या संचारबंदीच्या काळात नागरीकाना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याने दोन्ही तालुक्यातील बहुतांश गावातील सरपंचांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दोन्ही उपविभागात वारंवार लेखी तक्रारी देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२०-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे. दर्यापूर व अंजनगाव उपविभाग शाखा अभियंत्यांची प्रत्येकी ३ पदे रिक्त आहेत. सदर योजनेच्या देखभाल दुरूस्तीकरिता विभागाचे ६२ कर्मचारी (जलसेवक) कार्यरत आहेत. तसेच कंत्राटदारांमार्फत आवश्यकतेनुसार कर्मचारी लावण्यात येतात. सदर योजनेद्वारे निकषाप्रमाणे ग्रामीण भागात ५५ लिटर्स व शहरी भागात १२५ लिटर्स पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही. सदर योजनेद्वारे निकषाप्रमाणे ग्रामीण भागात ५५ लिटर्स व शहरी भागात १२५ लिटर्स पाणी पुरवठा करण्यात येत आहे. पाणी टंचाईच्या अनुषंगाने योजनेअंतर्गत गावातील लोकप्रतिनिधी व नळ ग्राहक यांच्या कडून पाणी टंचाईच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या लेखी तक्रारीची वेळीच दखल घेऊन कार्यवाही करण्यात येत असते.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दक्षिण मुंबई येथे शिवसेना प्रमुख कै.बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा उभारण्याबाबत**

**(९) ९७९३ (२८-०५-२०२०). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदुहृदय सम्राट शिवसेना प्रमुख कै.बाळासाहेब ठाकरे यांचा पुर्णाकृती पुतळा मुंबईतील डॉक्टर श्यामप्रसाद मुखर्जी बेटावर उभारण्यासाठी शासनाने मुंबई शहर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कै.बाळासाहेब ठाकरे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी शासनाच्या निरनिराळ्या विभागांची परवानगी घेणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवसेनाप्रमुखांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा आराखडा (Design) संबंधित विभागाने तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पुतळा उभारण्याचे व तयार करण्याचे काम हे कोणत्या संस्थेला देण्यात आले आहे तसेच शिवसेना प्रमुखांचा पुतळा उभारण्यासाठी व ते काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कालावधी निश्चित केला आहे काय,
(५) असल्यास, हिंदु ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याकरीता शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (२४-०६-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) शासन निर्णय सा.प्र.वि., दि.०२.०५.२०१७ व दि.०६.०५.२०१७ अन्वये पुतळा उभारण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आले असून पुतळा उभारण्यास मान्यता देण्याचे अधिकार संबंधीत जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार प्रबोधन प्रकाशन, मुंबई या संस्थेने दि.१८.०६.२०१८ अन्वये जिल्हाधिकारी यांचेकडे पुतळा उभारण्यास मान्यता देण्याबाबत मागणी केली. पुतळ्यासंबंधीत आराखडे तयार करण्यात आले असून जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी वरील शासन निर्णयामधील सर्व अटींच्या पुर्ततेनंतर दि. २८.०२.२०२० च्या आदेशान्वये प्रबोधन प्रकाशन संस्थेस दक्षिण मुबई मधील फोर्ट येथील डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी चौकातील वाहतूक बेटामध्ये शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा उभारण्यास मान्यता दिली आहे. शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वाच्या पुर्ततेवर पुतळा उभारण्यास मान्यता अवलंबून असल्यामुळे पुतळा उभारण्यासाठी कालावधी निश्चित करण्यात आलेला नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत केलेल्या निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांच्या कामाबाबत**

**(१०) ९८४२ (२८-०५-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला अंतर्गत निकृष्ट दर्जाचे बांधकाम झालेल्या रस्त्यांच्या तपासणीसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास समिती गठीत करण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या तपासणीत ११ कामांमध्ये दोष आढळून आल्याचे निष्पन्न झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ११ सदोष कामांपैकी फक्त ८ रस्त्यांचीच दुरुस्ती संबंधीत कंत्राटदाराकडून करून घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रस्त्याच्या निकृष्ट बांधकामाबाबत दोषी असणा-या संबंधीतांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-०६-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर ११ सदोष कामांपैकी ८ रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली असून उर्वरीत रस्त्यांची दुरुस्ती करून घेण्याबाबत कार्यकारी अभियंता यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) सदर रस्त्यांच्या बांधकामाबाबत संबंधित अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून संबंधित कंत्राटदाराकडून सदर रस्त्यांची दुरुस्ती करून घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड (जि.नांदेड) येथील ग्यानमता विद्याविहार शाळेच्या CBSE मंडळाची मान्यता रद्द करणेबाबत**

**(११) १००२१ (०६-०६-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड (जि.नांदेड) येथील ग्यानमाता विद्याविहार शाळेत प्रवेश देण्यासंदर्भात पालकांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदेड यांनी अभिलेखाची तपासणी केली असता केलेल्या तपासणी अहवालात गंभीर स्वरूपाची अनियमितता असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेच्या चौकशी अहवालात गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदेड यांनी ग्यानमाता विद्याविहार या शाळेच्या प्रवेशाबाबत RTE Act २००९ चा भंग होत असल्याचे तसेच शिक्षक/शिक्षकेत्तर/कर्मचारी व मुख्याध्यापकांची वैयक्तीक मान्यता संबंधित शिक्षण विभागाकडून घेतलेली नसल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर संस्था महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनीयमन २०११) नुसार शुल्काची रक्कम निश्चित करीत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर संस्थेची चौकशी शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी करून CBSE मंडळाची मान्यता रद्द करणेबाबतचा अहवाल दिनांक ५ फेब्रुवारी २०२० रोजी वा त्यासुमारास प्रादेशिक संचालक केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड पुणे, यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नियमितपणे शाळा चालवणारे शिक्षण संस्थेचे स्थानिक प्रशासन व प्राचार्य यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२७-०७-२०२०) :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.
(५) सदर शाळा बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदीचा भंग करीत असल्याने तसेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या तरतुदीप्रमाणे शाळा पुर्तता करीत नसल्याने शाळेची सी.बी.एस.सी.बोर्डाची मान्यता रद्द करण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा, परिषद नांदेड यांनी प्रादेशिक संचालक, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्याकडे शिफारस केली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चामोर्शी (जि.गडचिरोली) तालुक्यातील कुनघाडा व ३ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या कामाबाबत**

**(१२) १००६९ (२९-०५-२०२०). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चामोर्शी (जि.गडचिरोली) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत ५ कोटी रुपयांच्या कुनघाडा व ३ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे बांधकाम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे काम संथ गतीने सुरु असून कामाची मुदत पूर्ण होवूनही केवळ ६०% काम पूर्ण झाले असून या कामात वापरण्यात आलेले पाईप निकृष्ट दर्जाचे असल्याने सदर बांधकामात गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२०-०७-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे. सदर योजनेस मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत दिनांक ३ मार्च, २०१७ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. स्द्यस्थितीत सदर योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमात हस्तांतरित करण्यात आलेली आहे .
(२) हे खरे नाही. सदर योजनेरचे ९५ टक्के कामे पूर्ण झालेली असून योजना मार्च २०२० मध्ये कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर योजनेकरिता वापरण्यात आलेली पाईप्स निकृष्ठ दर्जाची नसून सदर पाईप्स लाईन्सची हायड्रॉलीक टेस्टींग करण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही. माहिती अप्राप्त

---

**मौजे बेलकुंड (ता.औसा, जि.लातूर) येथे सन २०१९ मध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या अनुदान वाटपात झालेली अनियमितता**

**(१३) १००७८ (०२-०६-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बेलकुंड (ता.औसा, जि.लातूर) येथे सन २०१९ मध्ये अतिवृष्टीमुळे शेतपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने घोषित केलेल्या अनुदान वाटपातअनियमितता झाल्याची तक्रार तसेच सदरहु अनुदानापासून वंचित असलेल्या पात्र शेतकर्यांना तातडीने अनुदान वाटप करण्याची मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी तहसीलदार औसा यांच्याकडे दिनांक ८ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच औसा तालुक्यातील किती शेतकरी अद्यापही सदर अनुदानापासून वंचित आहेत व त्यासाठी किती निधीची आवशकता लागणार आहे,

(३) असल्यास सदरहु निधी उपलब्ध करून देण्याबाबत व वंचित शेतकऱ्यांना अनुदान वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०३-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.

दिनांक १८ मे, २०२० रोजी मौजे बेलकुंड ता.औसा येथील शेतक-यांनी तहसीलदार औसा यांच्याकडे अनुदान मागणीबाबत निवेदन सादर केले आहे.

(२), (३) व (४) सन २०१९-२० मध्ये अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीबाबत पंचनामे करून ३३% पेक्षा जास्त नुकसान झालेल्या मौजे बेलकुंड येथील एकूण ५६३ पात्र

शेतक-यांपैकी ३३० शेतक-यांना रक्कम रू.२८७,६२,८००/- वाटप करण्यात आले आहे. अद्याप बेलकुंड गावातील २३३ आणि औसा तालुक्यातील ८१०२ शेतक-यांना मदत वाटप करणे बाकी आहे. तसेच औसा तालुक्यातील ८१०२ शेतकऱ्यांना मदत वाटप करणे बाकी आहे. अतिरिक्त निधी मागणीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झाला असून तो विचाराधीन आहे.

---

**शिक्षण हक्क कायद्यांतर्गत शाळांची नोंदणी न झाल्याबाबत**

**(१४) १०१७४ (२९-०५-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत शाळांची नोंदणी मागील वर्षाच्या तुलनेत केवळ २५% झाली असल्याने पाल्यांच्या प्रवेशाच्या समस्या वाढल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षी नोंदणीमुळे विद्यार्थ्यांना झालेल्या लाभाच्या तुलनेत सन २०२० मध्ये सदरहू लाभ मिळणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सन २०२० मध्ये शिक्षण हक्क कायद्यांतर्गत नोंदणी न केलेल्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-०८-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शेंद्रे (जि.सातारा) ते देहूरोड (जि.पुणे) पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाबाबत

**(१५) १०४२३ (०३-०६-२०२०). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेंद्रे (जि.सातारा) ते देहूरोड (जि.पुणे) पर्यंतच्या सहापदरी करणाच्या कामाचे सुमारे दहा कोटी रुपयाचे कंत्राट रिलायन्स इन्फ्रा कंपनीला दिलेले असून कंपनीने या कामासाठी पुन्हा उप ठेकेदार निवडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उप ठेकेदाराकडून निकृष्ट दर्जाची कामे सुरू आहेत, त्याचबरोबर वेळे, नसरापुर, शिंदेवाडी याठिकाणीची उड्डाणपुलाची कामे रखडलेली असतानांही त्याची देयके काढणे, तसेच वरील कामाचे जादा रक्कमेचे देयक काढल्याच्या तक्रारी आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या राष्ट्रीय महामार्गाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाची चौकशी करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने या संपुर्ण प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार संबंधित कंपनी, ठेकेदार व त्यांना सहाय्य करणा-या दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२०-०७-२०२०) :** (१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र.०४ चे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारितीतील असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

पुणे-सातारा रा.म.०४ कि.मी.७२५.०० ते कि.मी.८६५.३५० या रस्त्याचे काम मेसर्स पुणे सातारा टोल रोड प्रायव्हेट लि.या कंत्राटदारास NHDP Phase-V अंतर्गत DBFOT (Design, Build, Finance, Operate & Transfer) तत्वावर देण्यात आले असून सदर प्रकल्पाची एकूण किंमत रु.१७२४.५५ कोटी इतकी असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग

प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे. तसेच उप कंत्राटदाराची नेमणूक करण्यात तसेच मेसर्स पुणे सातारा टोल रोड प्रायव्हेट लि.या कंत्राटदारामार्फत देय असलेली रक्कम ठरविण्यात भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण कोणतीही भूमिका बजावत नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(२) सदर प्रोजेक्ट मेसर्स पुणे सातारा टोल रोड प्रायव्हेट लि.या कंत्राटदारास DBFOT (Design, Build, Finance, Operate & Transfer) तत्वावर देण्यात आले असल्यामुळे कामाची सर्व जबाबदारी कंत्राटदारास देण्यात आली आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

या प्रकल्पासाठी नियुक्त केलेले स्वतंत्र अभियंता वेळोवेळी कामाचे गुणात्मकपणे निरीक्षण करतात आणि तेथे असलेल्या कमतरतांबाबत सवलतकारास सूचित करतात. सवलतकारास त्याप्रमाणे कार्यवाही करावी लागते. सवलतकारामार्फत वेलू येथील भुयारीमार्ग पूर्ण करण्यात आला असून वाहतूकीसाठी खुला करण्यात आला आहे. नसरापूर येथील उड्डाणपूलावरील उजव्या बाजूचे काम पूर्ण करण्यात आले असून वाहतूकीसाठी खुले करण्यात आले आहे. तसेच डाव्या बाजूचे काम प्रगतीपथावर आहे. सवलतकाराने काही अडचणींमुळे सातारा जिल्ह्यातील शिंदेवाडी उड्डाणपुलाचे काम सुरु केले नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे वेळणेश्वर, साखरी आगर, कोंडकारूळ, बुधल, अंजनवेल, तवसाळ (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) आदी गावांत लाटांच्या पाण्याने होत असलेल्या नुकसानाबाबत**

**(१६) १०५५१ (०३-०६-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे वेळणेश्वर, साखरी आगर, कोंडकारुळ, बुधल, अंजनवेल, तवसाळ (ता.गुहागर) आदी गावांत गत ३ वर्षांपासून वारंवार लाटांचे पाणी लोकवस्तीत शिरल्याने घरे व नारळी पोफळीच्या बागांचे मोठयाप्रमाणात नुकसान झाले तसेच येथील रहिवाशांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जयगड (ता.जि.रत्नागिरी) येथील जिंदाल कंपनीने बांधलेल्या बॅकवॉटर वॉलमुळे लाटांची उंची वाढली असून त्यामुळे पाणी लोकवस्तीत शिरते असे स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ जुलै, २०१७ तसेच दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे पत्रव्यवहार करून चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र, खडकवासला, पुणे यांचेमार्फत अभ्यास होवून त्यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिलेल्या

अहवालात बॅकवॉटर वॉलमुळेच लाटांची उंची वाढून पाणी लोकवस्तीमध्ये जात असल्याचा निष्कर्ष काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (सीड्ब्लुपीआरएस), खडकवासला, पुणे यांच्या दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या अहवालानुसार दिनांक १३ ते १७ जुलै, २०१८ च्या कालावधीत लोकवस्तीत शिरलेले पाणी हे बॅकवॉटर वॉलमुळेच शिरले आहे, याचा सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून अधिकची माहिती आवश्यक असल्यामुळे व्यवस्थापक,जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून प्राप्त माहिती केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (सीड्ब्लुपीआरएस), खडकवासला, पुणे यांना पाठविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून प्राप्त माहितीच्या अनुषंगाने केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (सीड्ब्लुपीआरएस),खडकवासला, पुणे यांनी सखोल अभ्यास करून कोणते निष्कर्ष काढले आहेत व तद्नुसार सदर कंपनीविरोधात व याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०३-०७-२०२०) :** (१) होय. अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांच्या दि.८.८.२०१८ च्या अहवालानुसार दि.१३ ते १७ जुलै, २०१८ च्या कालावधीत लोकवस्तीत शिरलेले पाणी हे ब्रेकवॉटर वॉलमुळेच शिरले आहे, याचा सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून प्राप्त माहिती केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांना पाठविण्यात आली आहे. मात्र त्यांनी सदर माहिती अपुरी असून अधिकची माहिती पाठविण्याबाबत कळविले आहे. त्यास अनुसरुन मागविण्यात आलेली अधिकची माहिती जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून दि.१७.६.२०२० रोजी प्राप्त झाली आहे. सदर माहिती पत्तन अभियंता, रत्नागिरी यांचे दि.१९.६.२०२० चे पत्रान्वये केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांना पाठविण्यात आली आहे. सदर माहितीचा सखोल अभ्यास करुन योग्य तो निष्कर्ष केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांच्याकडून काढण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१७) ११३२४ (११-०७-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडातील वॉटर ग्रीड योजनेसाठी लातूर व उस्मानाबाद जिल्ह्याच्या पाणी ग्रीड प्रकल्पाच्या HAM आधारित निविदा दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजी मागविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यांसाठी अनुक्रमे रु.१७१२.९१ कोटी व रु.१४०९.५७ कोटी अशा एकूण रु.३१२२.४८ कोटी या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असली तरी सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात केवळ २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठवाड्यातील भीषण पाणी टंचाई निवारणार्थ महत्त्वपूर्ण असलेल्या या प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२१-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) वरीलप्रमाणे प्राथमिक तरतूद करण्यात आली असून या कामास शासनाकडून आवश्यकतेप्रमाणे निधी उपलब्ध करुन देणेबाबत विचारार्थ आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत

**(१८) ११३६४ (१०-०७-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या अव्यावसायिक विद्यापीठांच्या अंतिम वर्षातील अंतिम सत्राच्या परीक्षा सद्य:स्थितीत न घेता विद्यार्थ्यांनाच परीक्षा न देता पदवी प्रमाणपत्र घेण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्याचा निर्णय दिनांक १९ जून २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील अंतिम वर्षाच्या परिक्षा राज्य शासनाने ऐच्छिक केल्या असताना विद्यापीठ अनुदान आयोग अंतिम वर्षाच्या परिक्षा रद्द करण्याबाबत अध्ययन करीत असून त्याचप्रमाणे नवे शैक्षणिक वर्ष माहे ऑगस्ट ऐवजी माहे ऑक्टोबर पर्यंत पुढे ढकलण्याचा प्रस्ताव आयोगाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक २४ जून, २०२० रेजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून विद्यापिठे मार्चपासून बंद असल्याने अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील सत्रात प्रवेश देण्यात यावेत व विद्यार्थ्यांना यंदा परिक्षेची अतिरिक्त संधी देण्यात यावी, अशी शिफारस समितीच्या अहवालानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यार्थ्यांना केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंतिम सत्राच्या परीक्षा न देताच पदवी धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पदवीची वैधताही धोक्यात येण्याची शक्यता तसेच नोकरीसाठी, पदव्युत्तर शिक्षणासाठी-विशेषतः विदेशी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेताना विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यताही सदर निर्णय घेताना विचारात घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बॅकलॉग असलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत अद्यापही शासनस्तरावर निर्णय व्हायचा असल्याने तसेच परीक्षा देण्याचा पर्याय निवडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत परीक्षा घेणे स्थानिक पातळीवरील कोरोना प्रादुर्भावावर अवलंबून असल्याने याही विद्यार्थ्यांच्या बाबतीत परीक्षेची अनिश्चितता अद्यापही कायम असून या विद्यार्थ्यांचे मुल्यांकन त्या त्या विद्यापीठांवर तसेच प्राधिकरणावर सोडल्याने राज्यात वेगवेगळे मुल्यांकन होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या बाबतीतही अव्यावसायिक अभ्यासक्रमानुसारच वरीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला असल्याने अंतिम सत्राची परीक्षा न देता पदवी देण्याच्या या निर्णयाचे दूरगामी परिणाम विद्यार्थ्यांवर होऊ शकतात, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

विद्यापीठांच्या अंतिम वर्षातील/ अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांना परीक्षा न देता विद्यापीठांनी योग्य ते सूत्र वापरुन निकाल घोषित करुन पदवी प्रमाणपत्र देण्याचा तसेच ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची इच्छा असेल, त्यांना परीक्षेला बसण्याची संधी देण्याचा निर्णय दिनांक १९ जून, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक २९ एप्रिल, २०२० च्या मार्गदर्शक सुचनांनुसार, विद्यापीठांच्या चालू शैक्षणिक वर्षातील (ज्या विषयांमध्ये विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला असेल अशा) विद्यार्थ्यांना "कॅरी फॉरवर्ड" ची पद्धत लागू राहील व प्रत्येक विद्यार्थी पुढच्या सत्रात किंवा पुढच्या वर्षात प्रवेश करेल. जेव्हा या परीक्षांचे आयोजन करण्यात येईल, तेव्हा त्या परीक्षेला गैरहजर किंवा अनुत्तीर्ण विद्यार्थांना उत्तीर्ण होणे आवश्यक असेल. तसेच ज्या विद्यार्थ्यांना आपल्या ग्रेडमध्ये सुधारणा करावयाची असेल, त्यांना अजून एक संधी उपलब्ध असेल.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

दिनांक १९ जून, २०२० च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक (अ) (३) नुसार, ज्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्याचा बॅकलॉग आहे, त्यांच्या बॅकलॉगच्या विषयांच्या परीक्षेसंदर्भात विद्यापीठांचे कुलगुरु व संबंधित अधिकारी यांची शासन स्तरावर बैठक घेऊन विचारविनिमय करुन निर्णय घेण्यात येईल, अशी तरतूद आहे.

(५) हे खरे नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) येथील ताडवाडी, मोरेवाडी, बोरगांव येथे निर्माण झालेली पाणी टंचाई**

**(१९) ११५०१ (१०-०७-२०२०). श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) येथील ताडवाडी, मोरेवाडी येथे भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून येथील महिलांना पाण्याकरिता दूरवर असणाऱ्या विहिरींवर अवलंबून रहावे लागत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ताडवाडी व मोरेवाडी येथे नळपाणी योजना राबविण्यासाठी शासनाने गत तीन वर्षात तीन वेळा योजनेचा मार्ग बदलला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच कर्जत मधील ओलमण ग्रामपंचायतीतील बोरगाव येथील भवानीपाड्यातील ग्रामस्थांना २ कि.मी. वरुन पाणी आणावे लागत असल्यामुळे त्यांच्याकरिता ओलमण ग्रामपंचायतीने शासनाच्या निधितून खाजगी जमिनीवर बोअरवेल करुन पंप टाकून दिला असूनही बोअरवेलच्या जागेचा मालक ग्रामस्थांना पाणी भरु देत नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी लघुपाटबंधारे विभागाकडे केली आहे. यास्तव उक्त बोअरवेल तातडीने ग्रामस्थांसाठी खुली करण्यात यावी अशी मागणी माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ताडवाडी, मोरेवाडी व भवानीपाड्यातील नागरीकांची पाणी टंचाई दूर होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
स्थानिक ग्रामस्थांच्या मागणीनुसार एक वेळा मार्ग बदललेला आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
संबंधित जागामालक पाणी भरु देत नसल्याबाबत भवानीपाड्यातील ग्रामस्थांनी दिनांक २६.०५.२०२० रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार तथा दंडाधिकारी, कर्जत यांना कळविले आहे.
(४) ताडवाडी व मोरेवाडी येथे पाणी टंचाई दूर करण्यासाठी सन २०२० च्या उन्हाळ्यामध्ये टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे. तसेच भवानीपाड्यातील ग्रामस्थांनाही ग्रामपंचायत ओलमनमार्फत टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात आयुर्मान पूर्ण झालेल्या एसटी बसच्या जागी नवीन १६०० गाड्या खरेदी करण्याबाबत**

**(२०) ११५३८ (११-०७-२०२०). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३ हजार ३६ जुन्या एसटी बसेसच्या बदल्यात नवीन १६०० गाड्या खरेदी करण्यासाठी शासनाने २०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना महामारी मुळे आलेल्या आर्थिक संकटामुळे राज्य शासनाने शासकीय खर्च ६७ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतल्याने या नव्या गाड्यांच्या खरेदीच्या निधीत कपात करण्यात आली असल्याची बाब दिनांक ६ मे २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी कपातीमुळे नव्या एसटी बसेस खरेदी करणे शक्य नसल्याने जुन्या एस.टी बस गाड्यांमधून प्रवासी वाहतूक करणे हे प्रवाशांकरिता धोकादायक ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करणात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२८-०७-२०२०) :** (१) शासनाने अर्थसंकल्पीय अंदाजात बस स्थानकाचे आधुनिकीकरण व वाहन खरेदीसाठी एकूण रु.३९५.०७ कोटीची तरतूद केलेली आहे.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग, दि.०४ मे, २०२० अन्वये शासनाने कार्यक्रमांतर्गत योजनांसाठी २०२०-२१ मध्ये अर्थसंकल्प निधीच्या फक्त ३३ टक्के निधी उपलब्ध होईल असा निर्णय घेतलेला आहे. तथापि, सदर शासन निर्णयानुसार राज्य परिवहन महामंडळाला मिळणाऱ्या निधीमध्ये किती कपात करण्यात येणार आहे, याबाबतचा निर्णय झालेला नाही.

(३) व (४) राज्य परिवहन वाहनांची आगार पातळीवर दैनिक, दशक व त्रैमासिक नियतकालिक देखभाल केली जाते. तसेच राज्य परिवहन वाहनांची स्थिती उत्तम ठेवण्याकरीता नियतकालिक कार्यक्रमानुसार वाहनांचे पुन:स्थितीकरण, आरटीओ पासिंग इ. केले जाते. धोकादायक वाहने मार्गस्थ केली जात नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यासह राज्यात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत शाळांची नोंदणी न झाल्याबाबत**

**(२१) ११५५० (११-०७-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत शाळांची नोंदणी मागील वर्षाच्या तुलनेत केवळ २५% झाली असल्याने पाल्यांच्या प्रवेशाच्या समस्या वाढल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहर व जिल्ह्यातील ८९६ शाळांची शिक्षण हक्क कायद्यानुसार २५ टक्के आरक्षित जागांसाठी ऑनलाईन नोंदणी झाली असून काही शाळांनी ऑनलाईन नोंदणी न करण्याचा निर्णय घेतल्याने अनेक विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित रहावे लागणार असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत वर्षी नोंदणीमुळे विद्यार्थ्यांना झालेल्या लाभाच्या तुलनेत सन २०२० मध्ये सदरहू लाभ मिळणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सन २०२० मध्ये शिक्षण हक्क कायद्यांतर्गत नोंदणी न केलेल्या शाळांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच फेब्रुवारी २०२० अखेर नोंदणीची सद्य:स्थिती काय आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

पुणे शहर व जिल्हयात आर.टी.ई.कायद्यानुसार पात्र ९७२ शाळांनी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) शाळेने नोंदणी केलेली नसल्याचे आढळून आल्यास क्षेत्रिय स्तरावरुन शाळेस नोटीस देवून खुलासा मागविला जातो. पुणे जिल्ह्यातील सर्व ९७२ शाळांनी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे. तसेच राज्यातील ९३३१ शाळांनी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अर्जुनी-मोरगांव येथील खरीपातील धान्याचे चुकारे शेतकऱ्यांना तात्काळ मिळणेबाबत

**(२२) ११६१८ (११-०७-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी-मोरगांव येथे खरीप हंगाम २०१९-२० मध्ये अनेक शेतकऱ्यांनी शासकिय हमीभाव धान केंद्रावर विक्री केलेल्या धानाचे चुकारे शेतकऱ्यांना मिळाले नसल्याचे माहे मार्च-२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या टाळेबंदीच्या काळ व शेतकऱ्यांनी मशागतीपुर्वी शेतीच्या कामाला प्रारंभ केला असून धानाचा पैसा आला नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शेतकऱ्यांना चुकारे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२९-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

तथापि, मार्केटिंग फेडरेशन या अभिकर्ता संस्थेमार्फत अर्जुनी-मोरगाव तालुक्यात खरीप पणन हंगाम २०१९-२० मध्ये मार्च, २०२० अखरे एकूण १० धान खरेदी केंद्रांवर १५८३१ शेतकऱ्यांकडून ४४८०३१.४० क्विंटल धान खरेदी केला असून, आधारभुत खरेदीनुसार प्रती क्विंटल रु.१८१५/- प्रमाणे होणारी रु.८१,३१,७६,९९१/- एवढी संपुर्ण रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यात आली आहेत.

तसेच महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ मर्या., या अभिकर्ता संस्थेमार्फत अर्जुनी-मोरगाव तालुक्यात आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या ६ खरेदी केंद्रांवर माहे मार्च, २०२० अखेर ७३७२ शेतकऱ्यांकडून २१०८६८.२५ क्विंटल धान खरेदी करण्यात आला असून त्यांची किंम्मत रु.३८,२७,२५,८७४.२५/- इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सेलू-देगावफाटा (जि.परभणी) रस्त्यावरील मोरेगाव येथील दुधना नदीवरील पुलाचे व जोडरस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२३) ११६४२ (११-०७-२०२०). श्रीमती मेघना दिपक साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील सेलू-देगावफाटा रस्त्यावरील मोरेगाव येथील दुधना नदीवरील निजामकालीन अरुंद पुलावरून मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक व यामुळे होणारी वाहतूककोंडी व अपघात टाळण्यासाठी अनेक वर्षापासून सुरु असलेले पुलाचे व जोडरस्त्याचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झाले नसल्याने वारंवार अपघाताच्या घटना घडत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाच्या कामाचा खर्च सद्य:स्थीतीत साडेतीन कोटी रुपयावरून सुमारे साडेसहा कोटी रुपये इतका झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुलाच्या नजीकचे जोडरस्ते या कामासाठी साडेपाच कोटी रुपयांच्या रक्कमेला प्रशासकीय मंजुरी मिळूनही रस्त्यासाठी भूसंपादनच न झाल्याने हे काम पूर्ण होऊ शकले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पुलाचे व जोडरस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाकडून अद्यापपर्यंत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

नविन पूलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तथापि, नविन पुलाच्या जोडरस्त्याचे काम भूसंपादनाअभावी अपूर्ण असल्याने सद्य:स्थितीत जुने पूलाचा वापर होत आहे. मात्र यामुळे अपघात झाल्याची नोंद पोलीस स्थानकाचे अहवालावरुन दिसून येत नाही.
(२) होय. हे खरे आहे.
(३) होय. हे खरे आहे.
(४) भूसंपादन प्रक्रियेअंतर्गत जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण करण्यात आली असून जमिनीच्या मूल्यांकनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे तालुक्यातील फागणे २१ गाव पाणी पुरवठा योजना पुनर्जिवित करण्याबाबत

**(२४) ११६६६ (१०-०७-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे तालुक्यातील फागणे २१ गाव पाणी पुरवठा योजना अनेक वर्षापासून बंद असून सदर योजना पुनर्जिवित करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना लवकर सुरु व्हावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी गत दोन ते तीन वर्षापासून पाठपुरवठा करीत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार फागणे २१ गावे पाणी पुरवठा योजना पुनर्जिवित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्याची, बिलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२३-०७-२०२०) :** (१) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नाशिक यांनी दि.१८.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये फ़ागणे २१ गांवे (ता.जि.धुळे) प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जिवित करण्याबाबतचा रु.६५१.०४ लक्ष इतक्या किंमतीचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर केला आहे..
(२) होय.
(३) उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने विभागाच्या दि.२८.११.२०१९ रोजीच्या शासन पत्रान्वये सदर योजना पुनरुज्जिवित करणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होईल किंवा कसे? याबाबत मुख्य अभियंता, मजीप्रा, नाशिक यांचेकडून स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविणेत आले होते. सदर माहिती शासनास दि.१८.०३.२०२० रोजी प्राप्त झाली आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची मुदत

मार्च २० पर्यत असल्याने मंत्रीमंडळाच्या मान्यतेने कार्यक्रमाची मुदतवाढ मिळण्याबाबत कार्यवाही चालू आहे. त्यानुषंगाने प्रस्तावाची तपासणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात केरळ पॅटर्नप्रमाणे वर्ग ब ते वर्ग ड या सर्व स्तरावर भरती प्रक्रिया एमपीएससी मार्फत करण्याबाबत

**(२५) ११७५० (११-०७-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनातील श्रेणी ‘ब’ आणि ‘क’ च्या रिक्त पदांची भरती करण्यासाठी ‘महापरीक्षा पोर्टल’ या नव्या परीक्षा पोर्टलची सन २०१७ मध्ये सुरुवात करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महापारीक्षा पोर्टलमार्फत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षा व निकालात मोठ्या प्रमाणात नोकरीसाठी आर्थिक देवाण - घेवाण व गैरप्रकाराबाबतच्या तक्रारी परीक्षार्थी, विद्यार्थी, पालक व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केल्या आहेत तसेच महापरीक्षा पोर्टलमार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये घोटाळे व अनियमितताबाबत विविध जिल्ह्यांत गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने सदरहु प्रकरणी त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात येत असलेले पोर्टलचे तांत्रिक परिक्षण (ऑडीट) पुर्ण झाले आहे काय व तद्‌नुसार अहवालामध्ये काय निष्कर्ष काढले आहेत व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येणार आहे,
(४) असल्यास, महापोर्टलद्‌वारे प्रत्येक जिल्ह्यासाठी घेतली जाणारी स्वतंत्र परीक्षा रद्द करून संपूर्ण राज्यासाठी पारदर्शकता व कालबद्ध कार्यक्रमाद्‌वारे एकच परीक्षा घेण्याबाबत व ऑनलाईन प्रणालीतील गैरव्यवहार टाळण्यासाठी राज्यात केरळ पॅटर्नप्रमाणे वर्ग ब ते वर्ग ड या सर्व स्तरावर भरती प्रक्रिया एमपीएससी मार्फत करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (२७-०७-२०२०) :** (१) होय.
(२) तक्रारी वेगवेगळ्या स्तरावर प्राप्त आहेत. प्राप्त झालेल्या तक्रारींवर वेग वेगळया स्तरावर (जिल्हा/राज्य) काही प्रकरणी कार्यवाही झालेली आहे व इतर प्रकरणी कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) तांत्रिक परीक्षण करण्यासाठी त्रयस्थ ऑडिट संस्थेला ही जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्यानुसार काम सुरु आहे.
(४) महापोर्टलद्‌वारे घेण्यात येणाऱ्या परीक्षेसंदर्भातील पदभरती व त्याअनुषंगाने प्राप्त तक्रारीमुळे परीक्षा पध्दती सर्व समावेशक बनविण्याच्या, मा.मुख्यमंत्री यांच्या सूचनेनुसार परीक्षेस (तात्पुरती) स्थगिती देण्यात आली त्यामुळे महापोर्टलद्‌वारे घेण्यात येणा-या सर्व

परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच त्या अनुषंगाने महापरिक्षा पोर्टल अंतर्गत घेण्यात येणाऱ्या परिक्षा पध्दतीत आवश्यक बदल करुन दि.२०/०२/२०२० रोजी सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार जाहिरात ते निवडप्रक्रीया या प्रक्रीयेचे संचालन संबंधित विभागाच्या स्तरावर होणार आहे. त्यानुसार नवीन निविदाप्रक्रीया राबविण्यात येवून सर्व्हीस प्रोव्हायडर (Service Provider) चे (Empanelment) करण्याची कार्यवाही महाआयटी मार्फत करण्यात येत आहे.

त्यानुसार निवड झालेल्या सर्व्हीस प्रोव्हायडर कडून संबंधित विभागास परीक्षा आयोजीत करता येईल.

तसेच यापुढील शासनाच्या वर्ग ब व ड पदभरतीच्या परिक्षा महापरीक्षा पोर्टलमार्फत न घेता संबंधित यंत्रणेमार्फत घेण्यात येणार आहेत. सद्य:स्थितीत ज्या प्रकरणी जाहीरात प्रसिध्द होऊन निवड प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे किंवा परिक्षेचे आयोजन होणे बाकी आहे अशा प्रकरणी त्या त्या संबंधित विभागांना सर्व आवश्यक माहिती व विद्यार्थ्यांनी भरलेल्या शुल्काची उर्वरित रक्कम महाआयटी कडून हस्तांतरित करण्यात येईल.सा.प्र.वि.(मातं) शासन निर्णय दि.२०/०२/२०२० च्या अनुषंगाने पदभरती संदर्भात सुधारीत शासन परिपत्रक निर्गमित करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते व आरक्षण विकसित करण्यासाठी महानगरपालिकेने भूसंपादन केलेल्या जमिनीबाबत**

**(२६) ११७५४ (१०-०७-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते व आरक्षण विकसित करण्यासाठी महानगरपालिकेने भूसंपादनाची कोणतीही कार्यवाही न करता सन २००४ मध्ये जमिनी ताब्यात घेतल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरक्षणाच्या जमीनी ताब्यात घेताना भूधारकांना टीडीआर अथवा एफएसआय स्वरूपात मोबदला देण्याची लेखी हमी महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्ता व आरक्षणासाठी ताब्यात घेतलेल्या जमिनीच्या भूधारकांना टीडीआर स्वरूपात मोबदला देण्यासाठी कलम ३७ अन्वये प्रस्ताव शासन स्तरावर मंजुरी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यांसाठी व आरक्षणासाठी महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या जमिनीचा मोबदला स्वरूपात भूधारकांना देण्याबाबत प्रस्ताव मंजुरीकरिता शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, गत आठ वर्षापासून शासनाकडे प्रलंबित असलेला प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासन स्तरावर कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०७-२०२०) :** (१) होय
(२) रस्ते विकसित करतांना काही जमिनधारकांना नियमानुसार मोबदला अदा करण्यात येईल असे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागामार्फत पत्र देण्यात आले होते.
(३), (४), (५) व (६) मंजूर विकास योजनेतील विकसित रस्ता बाधित क्षेत्राचा मोबदला वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक व टी.डी.आर. अनुज्ञेय करण्याविषयी पिंपरी चिंचवड शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.एन २.३ व एन २.४.३ मध्ये सुधारणा करण्याबाबत, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वयेचा प्रस्ताव दि.०३/०८/२०१२ रोजी मंजूरीस्तव सादर केला आहे. तथापि यानंतर शासनाने दि.२८/०१/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे टि.डी.आर. विषयक नविन विनियम मंजूर केला असून तो राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या नियमावलीत अंतर्भुत केला आहे. सदर विनियम पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसही लागु आहे. या नविन विनियमातील तरतुदी विचारात घेवून महापालिकेच्या स्तरावर उचित निर्णय घेवून कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

---

## वाडा (जि.पालघर) शहरातील पालघर-वाडा-परळी-देवगाव या मुख्य रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम रखडल्याबाबत

**(२७) ११९१८ (१७-०७-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) शहरातील पालघर-वाडा-परळी-देवगाव या मुख्य शहराच्या बाजारपेठेतून जाणा-या १६ मीटर रस्त्याच्या रुंदीकरणाची मागणी स्थानिक नागरिकांनी केली असून त्यास काही व्यापारांनी विरोध केल्याने रस्त्याचे रुंदीकरणाचे काम रखडल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाडा शहरात रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी बाजारपेठेतील काही दुकानेही तोडण्यात आली असून नियोजित १६ मीटरऐवजी निव्वळ एक दोन मीटरसाठी रस्ता रुंदीकरणाचे काम रखडले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरिक व व्यापारी यांच्यातील रुंदीकरण विरोधाचा वाद मिटविण्यासाठी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, पालघर व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना निवेदनपत्र दिले असूनही रस्त्याचे रखडलेले काम मार्गी लावण्यास विलंब होत आहे, तसेच या कामासाठी होणाऱ्या विलंबामुळे या कामाकरिता येणाऱ्या खर्चामध्येही वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदर रस्त्याचे रुंदीकरणाचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत विषयांकित रस्त्याचे ८० (ऐंशी) टक्के काम पूर्ण झालेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही. जागा उपलब्ध करून घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील तीन धोरी मोरवी पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत**

**(२८) ११९२० (१७-०७-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील शेणवा-डोळखांब मार्गावरील शेणवा उपसिंचन केंद्र क्र. ११ या तीन धोरी मोरवी पुलाचे बांधकाम हे निकृष्ट दर्जाच्या सिमेंट काँक्रीटचा लेप देऊन व कमी लोखंडचा वापर करुन निकृष्ट प्रतीचे केल्याचे माहे एप्रिल-मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना व्हायरसमुळे निर्माण झालेली परिस्थिती व पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची कामे मार्गी लावण्यासाठी शासनाने दिलेल्या परवानगीचा गैरफायदा घेऊन हायब्रीड अॅन्युईटी संस्थेच्या ठेकेदारांनी सुमार दर्जाची कामे सुरु केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच शहापूर, किन्हवली रस्त्यांची कामे गुजरातमधील मिलन असोशिएट या कपंनीकडून तर शेणवा-डोळखांब मार्गावरील रस्त्याचे काम अनिस इन्फ्राकॉम या कंपनीकडून निकृष्ट दर्जाचे केले असल्याचे निदर्शनास आल्याने या सर्व कामांची सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक जनतेकडून सातत्याने करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने या सर्व प्रकरणांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार दोषी ठेकेदारांविरुद्ध व त्यांना सहाय्य करणा-या अधिकारी/कर्मचा-यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच या प्रकरणी ज्या ठेकेदारांनी निकृष्ट दर्जाची कामे केल्याचे आढळून आले आहे त्यांची कोणतेही देयके मंजूर न करता त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-०८-२०२०) :** (१) अशा आशयाचे वृत्त मे २०२० मध्ये वृत्तपत्रात प्रसिध्द झाले, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) काही किरकोळ तक्रारी प्राप्त झाल्या, हे खरे आहे.

(४) प्रश्नाधिन बांधकामाची कार्यकारी अभियंता यांनी दि. १३ मे २०२० रोजी पाहणी केली असून काम स्विकारण्यापुर्वी पावसाळयानंतर कामाच्या दर्जाबाबत सखोल तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तपासणीअंती आवश्यकतेनुसार उचित दुरुस्ती करण्याचे कंत्राटदारास निर्देश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माध्यमिक शिक्षणाधिकारी व प्रभारी विभागीय उपसंचालक नितीन बच्छाव, नाशिक यांनी शालार्थ आयडी देण्याबाबत भ्रष्टाचार केल्याबाबत**

**(२९) १२०७२ (१०-०७-२०२०). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील माध्यमिक शिक्षणाधिकारी व प्रभारी विभागीय उपसंचालक श्री.नितीन बच्छाव, यांनी नविन शाळांचे प्रस्ताव व शिक्षकांच्या पगारासाठी शालार्थ आयडी देण्यात गैरव्यवहार केला असल्याने त्यांना माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान सेवेतुन निलंबीत करण्यात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालिन विभागीय उपसंचालक यांच्या कारभाराची चौकशी करण्यात येणार होती, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत त्यांच्या कारभाराची व नातेवाईकांच्या मालमत्तेची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (११-०८-२०२०) :** (१) व (२) होय.
(३) व (४) याबाबत शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे. चौकशी अहवालाअंती उचित पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे हर्णे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील भुईकोट व सुवर्णदूर्ग किल्यांचा विकास होणेबाबत**

**(३०) १२०७४ (११-०७-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली तालुक्यातील मौजे हर्णे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील भुईकोट व सुवर्णदूर्ग किल्याचा पर्यटनाच्या माध्यमातुन विकास करणे, किल्ल्यांना रोप वे तयार करणे,

वाहनतळासह किल्ल्यांवरील तलावांची दुरुस्ती करणे, जेट्टी बांधणे इत्यादी कामांबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२८-०७-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

सुवर्णदुर्ग किल्ला हा केंद्र संरक्षित स्मारक असून तो भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारीत असल्यामुळे सदर किल्ल्याच्या ठिकाणी रोप वे तयार करण्यासाठी तांत्रिक व व्यवहार्यता अभ्यास करुन डिपीआर तयार करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली नाही.

तसेच हर्णे, ता.दापोली येथील भुईकोट किल्ल्याच्या जवळ पर्यटक सुविधा निर्माण करण्यासाठी सन २०१६-१७ मध्ये वाहनतळाचे बांधकाम करणे, कारंजे तयार करणे, परिसर सुशोभीकरण करणे, अंतर्गत व जोड रस्ते तयार करणे इत्यादी कामांसाठी रु.२५.०० लक्ष निधी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील ॲन्युईटी पॅकेज क्र.५४ नांदुरी ते कळवण रस्त्यावर जागोजागी वळण, चढउतार असल्याने रस्ता सरळ व सुरक्षीत करण्याबाबत**

**(३१) १२०७९ (१७-०७-२०२०). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) नाशिक जिल्ह्यातील ॲन्युईटी पॅकेज क्र.५४ नांदुरी ते कळवण रस्त्यावर जागोजागी वळण, चढउतार असल्याने रस्त्याची सुधारणा करुन आवश्यक तेथे रस्ते सरळ व सुरक्षीत करणे गरजेचे असतांना त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वतंत्र यंत्रणा या रस्त्यावर कार्यान्वित असतांना एकही अधिकारी व कर्मचारी कार्यस्थळी उपस्थित रहात नाही, त्यामुळे कामावर नियंत्रण ठेवले जात नसुन ठेकेदार व मजुर यांच्याच जबाबदारीवर काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सप्तश्रृंग गडाला जोडणारा कळवण ते नांदुरी ते वणी हा मोठा रस्ता असतांना निकृष्ट दर्जाच्या कामामुळे सदर रस्ता वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कळवण शहरातुन जाणाऱ्या या रस्त्याचे काम गत दिड वर्षापासुन मंजुर असुनही प्रलंबित आहे व त्याकडे संबंधीत अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर रस्त्याचे फेर सर्वेक्षण करुन रस्ता दुरुस्ती करण्याबाबत तसेच दुर्लक्ष करणा-या संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आडे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील समुद्रालगत धुपप्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामास कार्यारंभ आदेश मिळणेबाबत**

**(३२) १२१६६ (११-०७-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आडे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील समुद्रालगत धुपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम मंजुर असूनही सदर बाबतचे टेंडर प्रसिद्ध (ओपन) होऊन देखील सदर कामास कार्यारंभ आदेश मागील ५ महिन्यांपासून दिले गेलेले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२७-०७-२०२०) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) मौजे आडे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील समुद्रालगत धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे कामाची निविदा सूचना दि.२२.८.२०१९ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा पडताळणीची बैठक दि.१८.९.२०१९ रोजी झाली. काही ठेकेदारांनी आवश्यक असणारी कागदपत्रे सादर न केल्याने त्यांना सदर कागदपत्रांची पूर्तता करण्यास संधी देण्यात आली व त्यानुषंगाने ठेकेदार यांनी सदरचे कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर मे.अमृता कंस्ट्रक्शन खेड यांची सर्वात कमी दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. दि.१.६.२०२० चे पत्रान्वये पत्तन अभियंता, रत्नागिरी यांनी ठेकेदार यांना कार्यारंभ आदेश देणेचे दृष्टीने आवश्यक ती सुरक्षा अनामत भरणेबाबत व आवश्यक ते इतर कागदपत्र त्वरीत सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. परंतु अद्यापपर्यंत अनामत रक्कम न भरल्याने त्याबाबत ठेकेदारास दि.१६.७.२०२० अन्वये नोटीस देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदुरा जिल्हा बुलढाणा येथील बसस्थानकाची दुरवस्था व इतर सोई-सुविधांबाबत**

**(३३) १२२८६ (१०-०७-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यात १०२ लहान मोठी गावे असून तालुका मुख्यालय नांदुरा येथील बसस्थानकामध्ये भौतिक व मूलभूत सोयीसुविधां अभावी तसेच बस स्थानकात नियमित बससेवा सुरू नसल्याने विद्यार्थी, वृद्ध, दिव्यांग तसेच महिला प्रवाशांची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक २९ जून, २०२० रोजी व त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदुरा येथे नवीन आगार निर्मिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर बसस्थानकामध्ये मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देऊन बसस्थानकाचे अपग्रेडेशन करणे व नविन आगार निर्मिती करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२८-०७-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) नांदुरा बसस्थानकात ६ फलाट असून, बसस्थानकात आवश्यक असणाऱ्या चालक वाहक विश्रांतीगृह, महिला विश्रांतीगृह, स्थानक प्रमुख कक्ष, चौकशी कक्ष, उपहारगृह, रसवंती, केशकर्तनालय, जेनेरिक, पार्सल, प्रवाशांकरीता मुतारी, आसन व्यवस्था, तिकिट आरक्षण कक्ष, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वतंत्र इन व आउट गेट, बसस्थानकास संरक्षक भिंत इत्यादी सुविधा उपलब्ध असून, बसस्थानकाचे रंगरंगोटीचे काम करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयात पोषण आहाराच्या वाटपात गैरप्रकार होत असल्याबाबत**

**(३४) १२३०० (११-०७-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील ४४४८ शाळांमधील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहारामध्ये महानगरपालिका, जिल्हा परिषद व खाजगी शाळांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी महानगरपालिका हद्दीतील ११ शाळा वगळता इतर सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना पोषण आहारातील धान्याचे वाटप केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही शाळांमध्ये ठराविक विद्यार्थ्यांना जास्त तर काहींना कमी साहित्याचे वाटप करण्यात येत असून काही शाळांनी तर सरसकट कमी प्रमाणात धान्याचे वाटप केल्याचे तसेच ठराविक तांदूळ काढून विद्यार्थी व पालकांना देण्यात आले असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरातील १३१ पैकी ३६ शाळांचा पोषण आहार बचत गटांना तर ९५ शाळांचा पोषण आहार सेंट्रल किचन शेडनुसार तीन बचत गटांना शिजविण्यासाठी देताना काहींनी तांदूळ, डाळी, गायब करुन कमी प्रमाणात साठा दिल्याने विद्यार्थ्यांना धान्य कमी मिळाले परिणामी त्यांना अर्धपोटी रहावे लागले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शिक्षणाधिकारी तसेच जिल्हापरिषदेच्या सदस्यांकडे तोंडी तक्रार करण्यात येऊनही लेखी तक्रार आल्याशिवाय चौकशी करणार नसल्याचे शिक्षणाधिकारी यांनी स्पष्ट केले, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही
(४) अंशत: खरे आहे.
(५) हे खरे नाही
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिंद-पिवळी-कांबारे (ता.शहापूर, जि.ठाणे) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत**

**(३५) १२३५६ (११-०७-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांच्यामार्फत वाशिंद-पिवळी-कांबारे (ता.शहापूर, जि.ठाणे) या रस्त्याचे काम गत २ वर्षापासून सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असून या रस्त्याच्या कामाबाबत स्थानिक नागरिकांकडून शासनाकडे अनेक तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांच्याकडे तक्रारी सादर केल्या असता त्यावर कोणतीच कार्यवाही न करता कंत्राटदाराला पाठिशी घालण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने सदरहू रस्त्याचे काम चांगले दर्जेदार करण्याबाबत तसेच संबंधीत दोषी कंत्राटदारावर व त्यास पाठिशी घालणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२७-०७-२०२०) :** (१) सदरील रस्त्याचे काम हायब्रीड ॲन्युईटी पॅकेज एमयु-०४ मध्ये समाविष्ट असून प्रकल्पासाठी १७ जानेवारी २०१९ रोजी काम सुरु करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(२) २३.३६ कि.मी. रस्त्यापैकी २१४ मी मध्ये काँक्रीटीकरण व ३.६० कि.मी. मध्ये बी.एम. ने मजबुतीकरण पूर्ण झाले असून सदरील काम व्यवस्थित आहे. काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत आहे अशा स्वरुपाच्या तक्रारी या कार्यालयास अप्राप्त आहेत.
(३) मा. आमदार श्री. दौलत दरोडा महोदयांनी प्रत्यक्ष भेटी दरम्यान काम संथ गतीने सुरु असल्याबाबत नाराजी व्यक्त केली, हे खरे आहे.
(४) हायब्रीड ॲन्युईटी पॅकेज एमयु-०४ मध्ये शहापूर शेणवा डोळखांब चोंढा रा.मा. ५० कि.मी. ०/०० ते ३८/०० व कांबारे पिवळी वाशिंद प्रजिमा ५७ कि.मी.०/०० ते २३/३६० ह्या दोन रस्त्यांच्या कामाचा समावेश आहे.

स्थानिक शेतकऱ्यांचा रुंदीकरणास विरोध होता. याबाबींमुळे विषयांकीत रस्त्यालगतच्या भुधारकांची रुंदीकरणासाठी मोबदल्याबाबतची मागणी असल्याने त्यांची समजुत काढण्यास ५ जानेवारी २०२० पर्यंत कालावधी गेला. तसेच २३.३६ कि.मी. रस्त्यापैकी १२.७० कि.मी. रस्ता राखीव वन क्षेत्रामधून जात असल्याने काम करण्यास मर्यादा आहेत. यामुळे प्रकल्पामधील दुसऱ्या रस्त्याचे बांधकामावर लक्ष केंद्रीत केल्याने ह्या रस्त्याचे बांधकाम फेब्रुवारी २०२० दरम्यान हाती घेतले. त्यानंतर १५ मार्च २०२० पासून कोविड-२०१९ मुळे लॉकडाऊन असल्याने काम बंद झाले.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील देसई-तिळसा-सोनाडे-खेलवड रस्त्याच्या दुरूस्ती कामात गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(३६) १२३६३ (०६-०८-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार अंतर्गत येणाऱ्या वाडा (जि.पालघर) तालुक्यातील देसई-तिळसा-सोनाडे-खेलवड रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असल्याचे माहे मे-जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या दुरूस्ती कामात खड्डे भरण्याकरिता सन २०१८-१९ व २०१९-२० या कालावधीत किती निधी मंजूर करण्यात आला व त्यामधून कोणकोणती कामे करण्यात आली तसेच सदरहू कामांचे कंत्राट कोणकोणत्या कंपन्यांना देण्यात आले व त्यांचेकडून सदरहू कामे विहीत कालावधीत व योग्य प्रकारे पूर्ण करण्यात आल्याबाबतची तपासणी करण्यात आली होती काय, असल्यास त्याचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, सदरहू रस्त्यावरील रस्ते दुरूस्ती व खड्डे भरण्याचे काम संबंधित कंत्राटदारांकडून बोगस पध्दतीने करण्यात आले असून पुन्हा पुन्हा तेच खड्डे बुजविण्याचे व रस्ते दुरूस्तीचे काम संबंधित कंत्राटदारांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी कंत्राटदार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी

अभियंता, शाखा अभियंता व अन्य दोषी अधिकारी यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर रस्त्यावर व्दिवार्षिक देखभाल दुरुस्तीने (AMC) कामे मंजूर असून ती खालील प्रमाणे आहेत-

१) सन २०१७-१८ व सन २०१८-२०१९ या कालावधीकरीता रुपये ३० लक्ष इतका निधी या कामाकरीता मंजूर करण्यात आला आहे. सदर कामाचे कंत्राट श्री.विनय भारव्दाज, जि.ठाणे यांना देण्यात आले आहे.

२) सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या कालावधीकरीता रुपये ७८ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर कामाचे कंत्राट श्री.हर्षद गंधे, वाडा जि.पालघर यांना देण्यात आले आहे.

सदर कामे ही व्दिवार्षिक देखभाल दुरुस्तीअतंर्गत मंजूर असून अनु.क्र. १ चे काम पूर्ण झाले आहे. अनु. क्र. २ चे काम प्रगतीत आहे. सदर कामांची वेळोवेळी तपासणी करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंबरनाथ व कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील नवीन नळजोडण्या देणे बंद करण्यात आल्याबाबत

**(३७) १२४६० (१२-०७-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ व कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने माहे एप्रिल, २०१६ ते मे, २०१८ या कालावधीत नवीन नळ जोडण्या देणे बंद केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन जोडण्या बंद केल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अनधिकृत नळ जोडण्यांच्या केलेल्या सर्व्हेनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पर्यायाने शासनाचे सुमारे २३ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे सन २०१९ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाचे २३ कोटी रुपयांचे नुकसान करणाऱ्यां अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२३-०७-२०२०) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील लालबाग परिसरातील पानवाला चाळीच्या पुनर्विकासाबाबत**

**(३८) १२५३९ (१०-०७-२०२०). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील लालबाग परिसरातील पानवाला चाळीच्या पुनर्विकासासाठी म्हाडा प्राधिकरणाने इमारतीच्या भूसंपादनाबाबत दिनांक २१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी दिनांक १४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास भुसंपादन करण्याबाबतचा प्रस्ताव गृहनिर्माण विभागास पाठवून बराच कालावधी उलटून गेला तरीही उक्त प्रस्तावास गृहनिर्माण विभागाने अद्‌याप मंजूरी दिलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पानवाला चाळीतील रहिवाश्यांची संक्रमण शिबिरातही पर्यायी निवास व्यवस्था करण्याच्या अनुषंगाने विकासकाकडून टाळाटाळ व दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी पानवाला चाळ रहिवाश्यांनी व स्थानिक आमदारांनी मा.गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे तात्काळ निर्णय घ्यावा अशी लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्‌य:स्थिति काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड (२७-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) म्हाडा प्राधिकरणाच्या अहवालानुसार, स्थानिक विधानसभा सदस्य महोदयांनी दि.२०.०२.२०१६ व दि.०२.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांना पानवाला चाळ क्र.२ व ३ लालबाग या इमारतींच्या रखडलेल्या पुनर्विकासाबाबत ठोस कार्यवाही करण्याकरिता विनंती केली आहे.
(४) मा.उच्च न्यायालयाने दि.२१.०१.२०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने दि.३१.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मेसर्स आर.बी.बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांना पुनर्विकासासाठी प्रदान केलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द केले आहे. तसेच म्हाडा प्राधिकरणाने दि.१४.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदर मालमत्ता भूसंपादित करण्याचा प्रस्ताव

शासनास सादर केला असून, प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने म्हाडा प्राधिकरणाकडून अधिकची माहिती मागविण्यात आली असून सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यात तपासणी अहवालास विलंब करणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्याबाबत**

**(३९) १२६७९ (११-०७-२०२०). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यामध्ये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत सुरु असलेल्या ५३ योजनांपैकी केवळ २० योजनांमध्येच प्रत्यक्ष पाणी पुरवठा सुरू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचे काम तीन टप्प्यात होते मात्र प्रत्येक टप्पा संपल्यानंतर त्रयस्थ पक्षाकडून याची तपासणी करणे सक्तीचे करण्यात आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापुर्वीच्या पाणी पुरवठा योजनांमध्येही त्रयस्थ पक्षाकडून तपासणी करुन घेण्याची तरतूद होती मात्र स्थानिक पॉलिटेक्निक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अभियांत्रिकी महाविद्यालय आदी यंत्रणाकडून ही तपासणी करण्यात येत होती परंतु आता ही तपासणी पुणे आणि मुंबईच्या संस्थांकडून करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेची पूर्णत्वाची मुदत ही १८ महिन्यांची आहे.मात्र पुणे व मुंबईच्या संस्थांकडून वेळेत तपासणी होत नसून तपासणी झाल्यानंतरही अहवाल देण्याकरिता सहा-सहा महिने विलंब करित असल्याने काम वेळेत पूर्ण करण्याकरिता कंत्राटदारांना व प्रशासनाला अडचणी निर्माण होत आहेत. तसेच एका टप्प्याचे काम पुर्ण झाल्यानंतर त्याचा अहवाल आल्याशिवाय देयके मिळत नसून देयके मिळाल्याशिवाय पुढे काम सुरू करता येत नसल्याने दुसऱ्या टप्प्यातील सुरु करावयाच्या १७ योजनांचे काम अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर तपासणी अहवालास विलंब करणाऱ्या संस्थांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२३-०७-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.
सद्य:स्थितीत २५ योजनांमधून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(२) अंशत: खरे आहे.
विभागाच्या दि.१५.०६.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार पाणीपुरवठा योजनांची गुणवत्ता व दर्जा उंचाविण्यासाठी किमान दोन वेळा त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करुन घेणे अनिवार्य आहे.
(३) अंशत: खरे आहे.

विभागाच्या दि.१८.०५.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकाकडून त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करुन घेणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) अंशत: खरे आहे.

त्रयस्थ तांत्रिक परीक्षण अहवाल प्राप्त होण्यास लागणारा विलंब विचारात घेऊन जिल्हास्तरीय निविदा समितीने योजनेच्या कामाची टप्पा-१ व २ अशी ६०% पर्यंत देयके अदा करण्याचा निर्णय घेतला असून, त्यानुसार कंत्राटदारास देयके अदा करण्यात आली आहेत.

(५) विभागाच्या दि.१४.०७.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर-विजयपूर (ता.जि.सोलापूर) या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४०) १२८१४ (०६-०८-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) सोलापूर-विजयपूर (ता.जि.सोलापूर) या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यासाठी शासनाने रुपये अठराशे कोटी खर्च केले असून सदरहू रस्त्याच्या कामात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तदनुसार सदरहू रस्त्याच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या कंत्राटदार व संबंधित अधिकारी-कर्मचा-यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१३-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,सोलापूर यांनी कळविले आहे.

(२) सोलापूर-विजयपूर (ता.जि.सोलापूर) या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारित आहे.

सदर रस्त्याचा प्रकल्प DFOT(Toll) (Design.Built, Finance.Operate and Transfer या तत्वावर आधारित असून त्यासाठी लागणारा निधी हा उद्योजकाने स्वत: उभारायचा आहे. सदर प्रकल्पात कुठलाही गैरव्यवहार झालेला नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या थकीत अनुदानाचा दुसरा हप्ता मिळणेबाबत.**

**(४१) १३०४१ (१३-०८-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक ३१ मार्च, २०१९ अखेर १२,१४९ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये असून सन २०१९-२० मध्ये संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांकडे सन २०१८-१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सादर केलेल्या १०,६१२ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना दर्जानुसार अनुज्ञेय परिरक्षण अनुदानाचा पहिला हप्ता प्रदान करण्यात आला असून सन २०१९-२० मध्ये मिळणाऱ्या अनुदानाचा दुसरा हप्ता जो माहे मार्च, २०२० मध्ये देय होता तो अद्यापही मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ग्रंथालयाना तातडीने थकीत अनुदान देण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक २ जुलै २०२० रोजी मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्याकडे तसेच दिनांक ४ जुलै २०२० रोजी वा त्यासुमारास सचिव वित्त विभाग यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील एकूण ग्रंथालयात पैकी सात जिल्ह्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांना गत सहा महिन्यापासून वेतन न मिळाल्यामुळे सदरहू ग्रंथालय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांची उपासमार होत आहे, हे ही खरे आहे

(४) असल्यास, गत तीन महिन्यापासून राज्यातील बंद असलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांना यापुढे किमान नऊ ते दहा या वेळेत ग्रंथ देवघेव प्रक्रिया सुरू करण्यासाठी परवानगी द्यावी तसेच अनुदान न मिळालेल्या परभणी, लातूर, यवतमाळ, गोंदिया, सिंधुदुर्ग, धुळे, आणि मुंबई शहर या ग्रंथालयांचे शासनाकडून देय असलेले ३२ कोटी २९ लाख रुपये विनाविलंब अदा करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २० मे २०२० रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाने केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०८-२०२०) :** (१) नाही.

(२), (३) व (४) मागील वर्षीचे थकीत अनुदान वितरीत करणेबाबत प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मराग्रं-२०२०/प्र.क्र.६०/साशि-५, दि.०३.०८.२०२० अन्वये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे सन २०१९-२० मधील थकीत अनुदान वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली असून संबंधित ग्रंथालयांना ग्रंथालय संचालनालयाकडून अनुदान वितरीत करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्वी-वर्धा (जि.वर्धा) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत**

**(४२) १३१७६ (११-०७-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) विधानसभा मतदार संघातील आर्वी-वर्धा या ६० कि.मी. रस्त्याचे बांधकाम ३ वर्षापुर्वी मंजुर केले असून ज्या कंन्स्ट्रक्शन कंपनीला या कामाचे कंत्राट देण्यात आले त्या कंपनीने या रस्त्याच्या कामाकरिता छोटे-छोटे इतर कंत्राटदार नेमून त्यांना कामे दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंत्राटदाराने संपुर्ण रस्त्याचे व पुलाचे खोदकाम करून ठेवले असल्यामुळे नागरिकांना ये-जा करण्याकरिता वळण रस्ते तयार केलेले असून हे वळण रस्ते अत्यंत अरूंद असल्यामुळे अनेक नागरिकांची वाहने पावसामुळे रस्त्याच्या कडेला उलटून अनेक अपघात झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कंपनीद्वारे संपुर्ण रस्त्याचे खोदकाम केलेले असल्यामुळे व काही ठिकाणी रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करून ठेवल्यामुळे थोड्याच कालावधीत रस्त्यावरील गिट्टी उखडल्यामुळे रस्ता नागरिकांसाठी धोकादायक ठरला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रस्त्याच्या व पुलाच्या सुरु असलेल्या कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे सुचना फलक लावण्यात आलेले नाहीत तसेच सदर काम अंदाजपत्रकानुसार करण्यात येत नसुन सिमेंट, लोहा, रेती चा अत्यंत कमी प्रमाणात वापर असल्यामुळे सदर रस्ता व पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार शासनाने सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१३-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

सदर कामाचे मे.आर.पी.पी. इन्फ्रा प्रोजेक्ट, तामिळनाडु कंपनीला दि.१५.१०.२०१८ ला कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहे. या कामाचे छोटे छोटे इतर कंत्राट देण्यात आलेले नाही.

(२) सदर कंत्राटदाराने रस्ता बांधकामाच्या ठिकाणी व तीन ठिकाणी लहान पुलाचे काम करण्याकरीता खोदकाम केलेले असले तरी नागरीकांना ये-जा करण्याकरीता बांधलेले वळणरस्ते दोन मार्गी वाहतुक जाण्यास सुस्थितीत आहेत. सदर वळण रस्ते वेळोवेळी दुरुस्त करुन वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही.

सदर रस्त्याचे व पुलाचे बांधकामात रस्ते परिवहन महामार्ग मंत्रालय मानकानुसार बांधकाम साहित्याची चाचणी घेण्यात येते. वापरलेले साहित्य निकृष्ठ दर्जाचे नसून बांधकाम निकृष्ठ दर्जाचे नाही.

(४) सदर रस्त्याच्या व पुलाच्या बांधकामाच्या ठिकाणी वळण मार्ग तयार करण्यात आलेले असून सदर ठिकाणी सुचना फलक/चेतावनी फलक लावण्यात आलेले आहे. सदर काम करारनाम्यातील बाबीनुसार व त्यांच्या मार्गदर्शक तत्वे व मानकानुसार करण्यात येत असून बांधकाम निकृष्ठ दर्जाचे नाही.

(५) काम गुणवत्तेनुसार व मंजुर वावानुसार होत असल्याने चौकशी करण्याची आवश्यकता नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्यातील इगतपुरी-त्र्यंबकेश्वर क्षेत्रातील नागरिकांचे पाणी टंचाईमुळे स्थलांतर होत असल्याबाबत

**(४३) १३२२१ (११-०७-२०२०). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) विधानसभा मतदात संघात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असून पाणी पुरावठ्याच्या विविध योजनांची कामे निधी अभावी रखडलेली असुन ,नागरिकांचे इतरत्र मोठ्या प्रमाणात स्थलांतर हे केवळ पाणी टंचाईमुळे होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिण्याचे पाणी ही मुलभुत गरज असतांनाही पाणी पुरवठा प्रकल्पाला प्राधान्य देण्याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी तात्काळ लक्ष देऊन पाणी पुरवठा योजने अंतर्गत रखडलेली कामे पूर्ण करून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्याच्या अनुषंगाने काय निर्णयात्मक कार्यवाही व अंमलबजवणी केली आहे वा करण्यात येत आहे
(४) अद्याप याप्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) या तालुक्यातील अपूर्ण कामे प्रगतीपथावर आहेत. ज्या ठिकाणी टंचाई भासत असल्यास मागणीनुसार टँकरचा पूरवठा करण्यात येत आहे. जलजीवन मिशन कार्यक्रमाद्वारे कायमस्वरुपी प्रश्न सोडविण्यासाठीही योजना प्रस्तावीत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बहादूरशेख येथील वाशिष्ठी नदीवरील ब्रिटीशकालीन पुल धोकादायक झाल्याबाबत

**(४४) १३२८३ (१७-०७-२०२०). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बहादूरशेख येथील वाशिष्ठी नदीवरील पुल हा ब्रिटीशकालीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलावरुन मुंबई-गोवा महामार्गाची वाहतुक होत असते, पुलाची मुदत संपून सुमारे १० वर्षांचा कालावधी उलटल्यामुळे हा पुल धोकादायक झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागिल पावसाळ्यामध्ये (सन २०१९ मध्ये) या पुलाचा धोका लक्षात घेवून हा १३ वेळा वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणामध्ये या ठिकाणी नवीन पुलाचे काम सुरु केले परंतु गेले काही महिने हे काम पुर्णपणे बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार वाशिष्ठी नदीवरील ब्रिटीशकालीन पुल मुदतबाह्य होऊन धोकादायक झाल्यामुळे नवीन पुलाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०७-२०२०) :**(१) हे खरे आहे.

(२) वाशिष्टी नदीवरील पुलाचे बांधकाम सन १९४३ ला पूर्ण झालेले असून पुलाच्या बांधकामास ७७ वर्ष पूर्ण झाली आहेत. अतिवृष्टी काळात पूलावरील वाहतुक सुरक्षिततेच्या दृष्टिने बंद ठेवण्यात येते.

(३) हे अंशत: खरे आहे.

सन २०१९ च्या पावसाळयात अतिवृष्टीमुळे पूर पातळी वाढल्याने खबरदारी व वाहतुक सुरक्षितता या दृष्टिने वाशिष्टी नदीवरील पूल ९ वेळा वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता.

(४) हे खरे आहे.

नवीन पूलाचे बांधकाम करण्याचे काम सुरु करण्यात आले होते. परंतु सदर कंत्राटदाराची कामाची प्रगती समाधानकारक नसल्याने त्यांच्याकडून काम काढून घेण्यात येऊन मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम करणारे अन्य कंत्राटदार यांना अधिकृतपणे पूलाचे उर्वरीत काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यांच्या मार्फत सदर पूलाचे काम प्रगतीत होते. तथापि कोविड-१९ ची आपत्ती व पावसाळा या पार्श्वभूमीवर सदर पूलाचे काम शक्य तितक्या लवकर करुन घेण्यात येत असून सदरचे काम मार्च २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) मुंबई-गोवा महामार्गावरील अन्य कामे करणारे मे. परशुराम-आरवली हायवेज प्रा.लि. यांना पूलाचे उर्वरीत बांधकाम करण्यासाठी केंद्रीय मंत्रालयाने तत्वत: मंजूरी प्रदान केली आहे व माहे मार्च २०२१ पर्यंत उपरोक्त काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कापसाळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) गावात नव्याने नळ पाणीपुरवठा योजना राबविणेबाबत**

**(४५) १३३२६ (११-०७-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कापसाळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) गावातील चिपळूण शहरापासून दोन किलो मीटरवर वसलेले गाव असून हा भाग मोठया प्रमाणावर विकसित होत असून माहे मार्च ते मे-जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान विहिरींचे जलस्त्रोत आटल्याने तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारणास्तव मौजे कापसाळ या गावाचा समावेश निमशहरी भागात करून नव्याने पाणी पुरवठा योजना राबविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१६ पासून वारंवार शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत खालीलप्रमाणे ३ नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत.

१.कापसाळ डिगेवाडी नपापुयो सन २०१२-१३

२.कापसाळ फणसवाडी, सन २०१२-१३

३.कापसाळ दुकानखोरी, सन २०१४-१५

या नळपाणी पुरवठा योजना पूर्ण असून पाणी पुरवठा सुरळीतपणे सुरु आहे. तथापि, कोकणातील भौगोलिक स्थितीमुळे उन्हाळ्याच्या शेवटी विहिरींचे जलस्त्रोत आटतात व सुमारे एक ते दिड महिना पाणी टंचाई भासते. रत्नागिरी जिल्ह्याचा जलजीवन मिशन आराखडा सन २०२०-२१ मध्ये कापसाळ गावाचा समावेश करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील लाभार्थ्यांना वैयक्तिक शौचालय उभारणीसाठी अनुदान मिळण्याबाबत**

**(४६) १३४०३ (१६-०७-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामिण भागातील नागरिकांना वैयक्तिक शौचालयांची उभारणी करुन त्यांचा वापर करावा यासाठी जिल्हा परिषदेच्या स्वच्छता विभागामार्फत उपक्रम राबविला जात असून लाभार्थीना बांधकामासाठी बारा हजार रुपयांचे अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर व उस्मानाबाद जिल्हयात हजारो लाभार्थी अनुदानाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, त्यानुसार उक्त लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०४-०९-२०२०) :** (१) केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील कुटुंबांनी वैयक्तिक शौचालय बांधून त्याचा वापर सुरु केल्यानंतर रुपये बारा हजार इतके प्रोत्साहन अनुदान देणेबाबत तरतूद आहे.
(२), (३) व (४) सोलापूर जिल्हयातील हजारो लाभार्थी अनुदानाच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे नाही.

उस्मानाबाद जिल्हयात मे, २०२० अखेरपर्यंत १६५५५९ कुटुंबांनी वैयक्तिक शौचालय बांधकाम केले. त्यापैकी १६४८६७ लाभार्थ्यांना मे, २०२० अखेरपर्यंत व ३४१ लाभार्थ्यांना त्यानंतर वैयक्तिक शौचालय बांधकाम प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्यात आले आहे. उर्वरीत ३५१ लाभार्थ्यांकडून प्रस्ताव घेऊन अनुदान देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्हयातील देवगाव फाटा ते सेलू या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असल्याबाबत

**(४७) १३४५९ (१७-०७-२०२०). श्रीमती मेघना दिपक साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयातील देवगाव फाटा ते सेलू या २० किलोमीटर रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असल्याने वाहतुकीसाठी अडचणी येत असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देवगाव फाटा ते सेलू रस्ता दुरुस्तीसाठी राष्ट्रीय सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय, जालना येथून ६ कोटी रुपयांचा कार्यारंभ आदेश २ महिन्यापूर्वीच मंजूर करूनही संबंधित कंत्राटदाराने अद्याप काम सुरू केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून संबंधित कंत्राटदारावर कारवाई व सदर रस्ता दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०७-२०२०) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) सदर कामाचा कार्यारंभ आदेश हा कोविड-२०१९ च्या लॉकडाऊनमध्ये देण्यात आला असून संचारबंदीमुळे कामास सुरुवात करता आली नाही.

(३) सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर असून लवकरात लवकर काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खानापूर व आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील गावामध्ये नवीन पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(४८) १३६२५ (१९-०७-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर व आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील घोटी बु., ऐनवाडी, बेणापूर, वाळूज, धोंडेवाडी घोटी खु.ता.खानापूर भिंगेवाडी, पुजारवाडी दि., मापटेमळा, करगणी, यपावाडी, शेडगेवाडी व इतर काही गावांमध्ये दूषित पाणी पुरवठा होत असून अनेक गावात पाणी टंचाई असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शेडगेवाडी (ता.आटपाडी, जि.सांगली) व इतर अनेक गावातील ग्रामस्थांनी नवीन नळपाणी पुरवठा योजना मंजूर करण्याची विविध स्तरावर मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त गावांमध्ये दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरीकांच्या आजाराच्या प्रमाणात वाढ झाली असून पाण्याच्या भीषण टंचाईमुळे त्यांना पाण्याकरिता दूरवर जावे लागत असल्याने पिण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर गावांमध्ये शुध्द पाणी पुरवठा करणे व पाणी टंचाई दूर करण्याकरिता नविन नळ पाणीपुरवठा योजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०७-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.

मापटेमळा, दिघंची ता. आटपाडी व वाळूज, बेणापूर ता.खानापूर येथे दुषित पाणी पुरवठा होत नाही तथापि, मोठया प्रमाणावर पर्जन्यमान झाल्याने व परिसर अस्वच्छ झाल्याने येथील हातपंपाचे पाणी नमुने दुषित आले होते. या ठिकाणी टी.सी.एल. टाकून पुर्न तपासणीकरीता नमूने दिले आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) वाळूज ता. खानापूर पुजारवाडी (दि), य.पा. वाडी ता. आडपाडी योजनेची कामे निविदा स्थरावर आहेत. घोटी (बु), ऐनवडी, बेणापूर, भिंगेवाडी, मापटेमळा, करगणी, शेडगेवाडी या गावांचा समावेश जल जीवन मिशन अंतर्गत सन २०२०-२१ च्या आराखडयात समावेश करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील दहिहांडा फाटा ते किनखेड रस्त्याचे बांधकाम निकृष्ट झाल्याच्या चौकशीबाबत**

**(४९) १३८२५ (१७-०७-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील दहिहांडा फाटा ते किनखेड रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याची चौकशी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिनस्त अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ अमरावती यांच्याकडून करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी, अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ अमरावती यांनी सदरहु चौकशी अहवाल मुख्य अभियंता प्रादेशिक विभाग, अमरावती यांना दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी अहवालामध्ये कोणती तथ्ये आढळून आली व तदनुसार दोषी आढळलेल्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, अमरावती यांनी त्यांच्या दि.३०.१२.२०१९ च्या पत्रान्वये सदर अहवाल मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांना सादर केला आहे.

(३) सदर अहवालामध्ये विषयांकित रस्त्याची दोष दायित्व कालावधी अंतर्गत आवश्यक दुरुस्ती कंत्राटदारामार्फत करवून घेणेबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच अहवालानुसार आवश्यक त्या दुरुस्त्या कंत्राटदाराकडून करवून घेण्याबाबत संबंधित जबाबदार अधिका-यांवर जबाबदारी सोपवण्यात आली असून दोषी अधिका-यांविरुध्द दोषारोप पत्रे तयार करणेबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कौशल्य विकास च्या माध्यमातून राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) यांना देण्यात येणाऱ्या मदतीबाबत**

**(५०) १३९३१ (१८-०७-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील ४५० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना (ITI) १० हजार कोटी रुपयांची मदत देण्याची घोषणा दिनांक २५ जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना (ITI) मान्यता देऊन त्यांना अनुदान देण्याचा प्रस्ताव देखील शासनाच्या विचाराधीन आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अनुदान प्रस्ताव निधी व पदनिर्मिती अद्यापही प्रलंबित आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अनुदान वाटपासह सदर अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाना (ITI) मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (१९-०८-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) अशासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदान देण्याबाबत शासनाचे धोरण नाही. तथापि दि. २९ मे, २०१९ च्या शासन निर्णयानुसार प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू केलेली असून सदर योजना अशासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थांना सुध्दा लागू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.